# महासागर

नागपूर

# वृत्तसागर

शुक्रवार, दि. १, ऑगस्ट २०२५


## गुंडांच्या टोळीने भरदुपारी तरुणाला लुटले

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३१ :

कामानिमित्त भावासोबत जात असलेल्या एका तरुणाला गुंडाच्या टोळीने अडविले. शस्त्राने त्याच्यावर हल्ला करून जखमी केल्यानंतर खिशातील रोकड आणि मोबाईल पळवला. ही घटना दुपारी 12 वाजताच्या सुमारास वाठोडा पोलिस ठाण्यांतर्गत घडली. भरदुपारच्या सुमारास घडलेल्या या घटनेने परिसरात प्रचंड खळबळ उडाली. पोलिसांनी तत्काळ शोध मोहीम राबवून दोन आरोपींना अटक केली, तर एक आरोपी अल्पवयीन असल्याने त्याला ताब्यात घेण्यात आले. इतर आरोपींचा शोध सुरू आहे. दिलीप कृष्णा ठवकर (38) रा. आदर्शनगर आणि मिलिंद दयाराम मेश्राम (38) रा. नांदगाव, भिवापूर अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. रिंकू ढोबळे, नितीन मेश्राम आणि शेंडीवाला नावाचे त्यांचे साथीदार फरार असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत. पोलिसांनी जखमी शुभम अशोक मंडपे (29) रा. श्रावणनगर, वाठोडाच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

शुभम हा त्याच्या चुलत भावासोबत मोटारसायकलने कामानिमित्त जात होता. उमरेड मार्गावर रामकृष्णनगरातील सेंट्रल बँकेसमोर ऑटो आणि दुचाकी वाहनाने आलेल्या 5 आरोपींनी त्यांचा रस्ता अडवला. काही कळण्यापूर्वीच एका आरोपीने खिशातून वस्तरा काढत शुभमच्या चेहऱ्यावर वार केला. यातून सावरण्यापूर्वीच दुसऱ्या आरोपींनी त्यांना मारहाण सुरू केली आणि जबरीने शुभमच्या खिशातील मोबाईल आणि 1 हजार रुपये काढून घेतले. यामुळे घाबरलेल्या आरोपींनी तलवार काढली. हवेत तलवार फिरवून नागरिकांना धमकावू लागले. पोलिसांना माहिती दिल्यास जिवे मारण्याची धमकी दिली आणि पळून गेले.

# बुद्धिबळात दाक्षिणात्य राज्यांचे वर्चस्व

## महाराष्ट्राची तुलना करणे अवघड : विश्वचषक विजेती दिव्या देशमुखचे मत

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३१ :

नागपूर येथे झालेल्या पत्रकार परिषदेत बुद्धिबळ विश्वचषक विजेती दिव्या देशमुख हिने महाराष्ट्र आणि दाक्षिणात्य राज्यांच्या बुद्धिबळ स्थितीबद्दल परखड मत मांडले. तिच्या मते, महाराष्ट्रात बुद्धिबळाविषयी सकारात्मक वातावरण असले तरी दाक्षिणात्य राज्यांचे या खेळावर वर्चस्व आहे. तिच्या विश्वचषक विजयामुळे महाराष्ट्रात बुद्धिबळाच्या वातावरणात भर पडेल, परंतु त्यामुळे महाराष्ट्र लगेच बुद्धिबळाचा हब होईल असे म्हणणे धाडसाचे ठरेल असे तिने स्पष्ट केले.

दिव्याने वयाच्या १९ व्या वर्षी विश्वचषक जिंकला तर गुकेश दोमाराजूने १८व्या वर्षी जगज्जेतेपद पटकावले.



तरुणांनी बुद्धिबळ करिअर म्हणून स्वीकारावे का, या प्रश्नावर दिव्याने सांगितले की हे प्रत्येकाच्या परिस्थितीवर अवलंबून आहे. मिळणारे वातावरण, पाठिंबा आणि आर्थिक घटक महत्वाचे असले तरी सर्व अडचणींवर मात करता येते. विश्वचषक विजयाबद्दल बोलताना दिव्या म्हणाली की तिला आनंद जरूर आहे, पण ती त्यावर समाधानी नाही. हा केवळ प्रवासाचा प्रारंभ असून आणखी मोठा पल्ला गाठायचा आहे. खेळादरम्यान दबावाबद्दल विचारले असता तिने सांगितले की दबाव अनेक वर्षांपासून आहे, परंतु एकदा खेळायला सुरुवात केली की तो झुगारून देते.

दिव्याचे वडील डॉ. जितेंद्र देशमुख यांनी तिच्या विजयाचा भारतीय म्हणून अभिमान व्यक्त केला. त्यांच्या मते विजयात प्रादेशिकवाद आणू नये, तरीही एक महाराष्ट्रीय आणि नागपूरकर म्हणून हा गौरवाचा क्षण आहे. या कार्यक्रमात महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष परिणय फुके यांनी दिव्याच्या नावाने नागपुरात बुद्धिबळ प्रशिक्षण अकादमी सुरू करणार असल्याची घोषणा केली.

## नासुप्रच्या अधिकाऱ्याला काळे फासले

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ३१ :

महाराष्ट्र नवनिर्माण सेना नागपुरात आक्रमक होताना दिसून येत आहे. कधी मराठी भाषेच्या मुद्द्यावर तर कधी नागरी समस्या, प्रशासनातील गैरव्यवहार आदी मुद्यांवर अलिकडे मनसे आंदोलने, मोर्चे काढत आहे. मनसेने २०२३ मध्ये आंदोलन केले आणि त्यांना नागपूर सुधार प्रन्यासचे तत्कालिन सभापती मनोजकुमार सूर्यवंशी यांनी आश्वासन दिले. परंतु ते आश्वासन पाळण्यात आले नाही म्हणून गुरूवारी आंदोलन करत नासुप्रच्या एका अधिकाऱ्याला काळे फासण्यात आले.



मनसेने नासुप्रच्या विभागीय कार्यालयात कार्यरत असलेल्या अधिकारी सुरेश चव्हाण यांच्यावर भ्रष्टचाराचे गंभीर आरोप करत त्यांना काळे फासून निषेध केला. चव्हाण यांना सलग १० वर्षांपासून एकाच पदावर ठेवण्यात आले असून या काळात त्यांनी अनेक भूखंड वाटपांमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार केल्याचा आरोप मनसेने केला आहे. मौजा-चिखली (देव) येथील खसरा क्र. ८३, ८४/१ वर अनधिकृत अतिक्रमणकर्त्यांना भूखंड देण्याचे आमिष दाखवून लाखो रुपये घेतल्याचे समोर आले आहे. तसेच, मध्य नागपूरमधील भानखेडा येथे विकास निधी अंतर्गत करण्यात येणारी सिमेंट रस्त्यांची कामे प्रत्यक्षात न करता, नागपूर महापालिकेने केलेल्या कामांचे बनावट देयक तयार करून शासनाची फसवणूक करण्यात आली.

या प्रकारात चव्हाण यांच्यासह काही कंत्राटदारांचा सहभाग असल्याचा आरोप आहे. मनसेने या सर्व प्रकरणांवर तातडीने कारवाई करून दोषींवर कठोर शासन करण्याची मागणी केली आहे. याच मुद्यांवर २०२३ ला मनसेने नासुप्रच्या मुख्यालय मोर्चा काढला होता. त्यानंतर चव्हाण यांना निलंबित करण्यात आले आणि परत घेण्यात आले.

त्यांना कामावर घेण्यात येऊ नये, अशी मागणी मनसेची होती. त्यांना विनाकारण वेतन देता येणार नाही. म्हणून त्यांना नासुप्रच्या दक्षिण विभागात रूज करवून घेण्यात आले. परत मनसेने त्यांना कोणत्याही परिस्थिती ज्या भागात त्यांनी कंत्राटादारांना हाताशी धरून गैरव्यवहार केला.

तेथे बदल करून नये म्हणून सभापती संजय मिणा यांना निवेदन दिले होते. पण, अलिकडे त्यांना पुन्हा पूर्व विभागात स्थापत्य अभियांत्रिकी सहायक या पदांवर नियुक्ती देण्यात आली. त्यामुळे मनसेने कार्यालयाच्या परिसरात त्यांना गाठवून त्यांना काळे फासले. या आंदोलनाचे नेतृत्व मनसेचे उमेश उतखेडे आणि दिनेश मांगलेकर यांनी केले.

## ७०० लोकांनी भरले देहदानाचे फॉम

**एका वर्षात चार जणांचे देहदान**

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३१ :

नागपूर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विविध वर्तमानपत्रातून देहदानाविषयी लोकांनी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. त्यापासून प्रेरणा घेत महापालिकेतील निवृत्त झालेल्या अनघा वेखंडे यांनी भारूड या काव्य प्रकाराद्वारे देहदानाच्या प्रचार आणि प्रसाराला वाहून घेतले आहे. वेखंडे यांच्या "दानपावलं हो" फाउंडेशनतर्फे एका वर्षात चार देहदान आणि एक नेत्रदान करण्यात आले. फाऊंडेशनजवळ ७०० लोकांनी देहदानाचे फॉर्म भरलेत आणि जवळपास ७ हजार लोकांपर्यंत आम्ही पोहोचलो, असे वेखंडे यांनी अभिमानाने सांगितले. आम्ही कार्यक्रमाचे कुठलेही शुल्क घेत नाही. जाण्या-येण्याचा खर्च संस्था स्वतः करते. साऊंड सिस्टिमसह प्रोजेक्टर सर्व संस्थेचे आहे, असे वेखंडे यांनी सांगितले. पण काही संस्था आपणहून मानधन देऊ करतात. ते नम्रपणे स्वीकारतो, कारण संस्थेला एक रुग्णवाहिका घ्यायची आहे. त्यातून मरणोत्तर देहदान करणाऱ्यांना रुग्णवाहिकेचीही सेवा द्यायची आहे. लोकसहभाग वाढता राहिला तर आम्ही यशाचे शिखर गाठू आणि पंतप्रधान मोदींचे स्वप्न साकार करू, असे वेखंडे यांनी सांगितले. पंचवीस वर्षांपूर्वी निरंजन भाकरेंचं भारुड बघितले होते. त्यातून जागृती केली जात होती.

त्या वेळेला आपणही भारूडातून देहदानाविषयी जागृती करावी, असे ठरवले. पण मध्यंतरी शक्य झाले नाही. मग नंतर देहदान यावर भारुड सादर करण्याचा निर्णय घेतला. आणि भारुड लिहायला सुरुवात केली. पण मी डॉक्टर नाही मग माज्या लिखाणाला मला योग्य ते मार्गदर्शन हवं होतं. डॉ. रवी वानखेडे यांची भेट घेतली. त्यांच्या सूचनांमुळे भारूड लिहून झाले. डॉ. रवी वानखेडे यांनी त्यात जुजबी त्यांनी बदल सुचवले. नंतर सर्वश्री डॉ. संजय कोलते, उदय बोधनकर, संदीप पारसकर यांचे मार्गदर्शन लाभले. त्या नंतर आज सादर करीत असलेले वऱ्हाडी भाषेतील भारूड तयार झाले, असे वेखंडे यांनी सांगितले.

भारूडाचा पहिला प्रयोग लता मंगेशकर हॉस्पिटल, सीताबडीर्ला झाला. त्यानंतर एका पाठोपाठ एक ९९ प्रयोग झाले. यात सेंट्रल जेल मधला प्रयोग खूप चांगला झाला. ३०० बंदीवान या कार्यक्रमाला हजर होते. कार्यक्रमानंतर अनेकांनी देहदान करण्याची इच्छा व्यक्त केली. तसेच वृद्धाश्रम, शाळा, कॉलेज, मेडिकल कॉलेज, योग वर्ग, मंदिर आदी ठिकाणी आमचे प्रयोग झाले. यापुढे शहरासोबतच ग्रामीण भागात जनजागृती करणार आहो. प्रयोगाला लागणारे सर्व साहित्य संस्थेने स्वतः विकत घेतले आहे. प्रोजेक्टरवर आम्ही डॉक्टर संजय कोलते यांनी देहदानावर लिहिलेले आणि गायलेले गाणे वातावरण निर्मितीसाठी दाखवतो. कार्यक्रम ४५ मिनिटांचा असून, सात मिनिटाची डॉक्युमेंटरी आहे. संस्थेमार्फत देहदान करणाऱ्यांच्या कुटुंबीयांना सन्मानजनक सन्मान राशी देण्याचा निर्णय घेतलेला आहे, असे त्यांनी सांगितले. काळाची गरज लक्षात घेता लोकसहभागातून एक रुग्णवाहिका घेण्याचा प्रयत्न आहे. कारण सध्या रुग्णवाहिकेसाठी इतर संस्थांना विनंती करावी लागते.

## हिट अँड रनमध्ये वृद्धाचा मृत्यू

**नागपूर :** घरून फिरायला निघालेल्या वृद्धाला भरधाव असलेल्या मोटारसायकलस्वाराने जबर धडक दिली आणि पळून गेला. यात गंभीर जखमी वृद्धाचा जागीच मृत्यू झाला. ही घटना एमआयडीसी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. देवराव चिंधू काळे (77) रा. रमाबाई आंबेडकरनगर, जयताळा असे मृताचे नाव आहे. बुधवारी सायंकाळी 7 वाजताच्या सुमारास देवराव नेहमीप्रमाणे घरून फिरायला निघाले होते. जयताळा मार्गावर साक्षी मेडिकल स्टोअरसमोर अज्ञात मोटारसायकलस्वाराने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवून देवराव यांना मागून जबर धडक दिली. देवराव खाली पडून गंभीर जखमी झाले.

## लोकसेवा हक्क कायद्याची अंमलबजावणी करावी : आ.आशिष देशमुख

■ महासागर प्रतिनिधी,
सावनेर, दि. ३१ :

दिनांक 30 जुलै 2025 ला पंचायत समिती सावनेर येथे सावनेर समन्वय समितीची बैठक पार पडली. सर्व नवीन पदाधिकाऱ्यांनी आपला कारभार त्यावेळी स्वीकारला. समन्वय समितीचे अध्यक्ष आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी सर्व अधिकाऱ्यांकडून प्रत्येक विभागाचा आढावा घेतला व संबंधित सर्व अधिकाऱ्यांना योग्य कार्यवाही करावी, असे आदेश दिले.

सुरुवातीला आमदार डॉ आशिषराव देशमुख यानी सर्व अधिकाांना सांगितले की, या सर्व समन्वय समितीच्या सदस्यांसोबत समन्वय साधून आणि सहकार्य करून सावनेर तालुक्यातील लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी आदर्श शासन कार्यप्रणाली राबवावी तसेच नागरिकांना सेवेचा हक्क देणाऱ्या महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम या सेवा हमी कायद्याची अंमलबजावणी योग्य रीतीने करावी.

या कायद्यान्वये राज्याच्या नागरिकांना पादरर्शक, गतिमान, सार्वजनिक व कालबध्द सेवा मिळण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे.



"कोणत्याही अधिकाऱ्याने जनतेचे प्रश्न सोडविताना हलगर्जीपणा करू नये, ठराविक वेळेत लोकांच्या समसयेचे निवारण करावे तसेच या कायद्याविषयी प्रत्येक ग्रामपंचायतला माहिती द्यावी. अतिवृष्टीमुळे ठिकठिकाणी पाणी साचले असून रस्तेसुद्धा खराब झाले आहे, याची दखल घेऊन व्यवस्था करावी.

प्रत्येक नागरिकाला चांगले पाणी प्यायला मिळावे, याकरिता तसेच जिथे पाण्याची काहीही व्यवस्था नाही अशा ठिकाणी नवीन योजना आणून पाणी उपलब्ध करून द्यावे, असे आदेश दिले. पिण्याच्या पाण्याच्या विहिरीची काळजी घ्यावी, पाण्याची टंकी वेळोवेळी स्वच्छ धुवावी, गावातील कचऱ्याची विल्हेवाट योग्यप्रकारे लावावी, रोगाची साथ येऊ नये म्हूणन लोकांच्या चांगल्या आरोग्यासाठी फॉगिंग मशीनद्वारे फवारणी करावी जेणेकरून मलेरियासारख्या आजारापासून संरक्षण मिळेल.

हिरवेगार, निसर्गरम्य व ऑक्सिजनयुक्त शहर होण्याकरिता जास्तीत जास्त झाडे लावावी, मोकाट जनावरांची व्यवस्था करावी, कृषी विभागाकडून शेतकऱ्यांसाठी चांगल्या योजना राबवाव्या, शेतकऱ्यांना जंगली प्राण्यांपासून पीक संरक्षण करण्यासाठी झटका मशीनचा प्रस्ताव सादर करावा, झुडपी जंगल अतिक्रमणसाठी पट्टेवाटप कार्यवाही लवकर करावी.

भूमिअभिलेख कार्यालयाने लवकरात लवकर आपली कार्यप्रणाली सुधारावी व प्रलंबित असलेली कामे निकाली लावावी. पोलीस विभागाने अवैध दारूबंदी करावी, शाळा कॉलेजच्या विद्यार्थिनींसाठी दामिनी पथकाविषयी जनजागृती करावी, कोचिंग क्लासेसजवळ सीसीटीव्ही कॅमेरे लावावे, सायबर क्राईम रोखावे, ऑफिसर थंडर मोहीम राबवावी", अशा सूचना समन्वय समितीचे अध्यक्ष आमदार डॉ आशिषराव देशमुख यांनी सर्व अधिकाऱ्यांना दिल्या.

या आढावा बैठकीमध्ये माजी भाजप जिल्हाध्यक्ष डॉ राजीवजी पोतदार, माजी नगराध्यक्ष अरविंद लोधी, भाजप जिल्हाध्यक्ष मनोहर कुंभारे, भाजप नेते रामराव मोवाडे भाजप शहराध्यक्ष मंदार मंगळे, दिगंबर सुरतकर, महेश चकोले, पियुष बुरडे, उपविभागीय अधिकारी संपत खलाटे, खंडविकास अधिकारी हिरुडकर, तालुका आरोग्य अधिकारी किरण जाधव, तहसीलदार अक्षय पोयम, समन्वय समितीचे सदस्य व इतर अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते दिव्या देशमुखचा सत्कार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३१ :

जॉर्जिया येथील बातुमी येथे आयोजित फिडे वुमन्स वर्ल्ड कप २०२५ वर अवघ्या १९ व्या वर्षी नागपूरच्या दिव्या देशमुखने आपली मोहर उमटवून संपूर्ण जगाचे लक्ष वेधून भारतीय खेळाडू ग्रॅण्ड मास्टर कोनेरु हम्पीला चेकमेट करत बुद्धीबळातील हा विश्वकप तिने अलगद आपल्याकडे घेत ८८ वी भारतीय ग्रॅण्ड मास्टर हा किताब मिळविला. तिच्या या अभूतपूर्व यशाबद्दल महाराष्ट्र शासनातर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, क्रीडा व युवक कल्याण दत्तात्रय भरणे, राज्यमंत्री आशिष जायस्वाल यांच्या प्रमुख उपस्थितीत २ ऑगस्ट रोजी जाहीर नागरी सत्कार केला जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी दिली.

नागपूर कन्येच्या या जागतिक यशाबद्दल आयोजित समारंभासाठी नागपूरकरांसह जिल्ह्यातील सर्व क्रीडा संघटना, २ ऑगस्ट रोजी सुरेश भट सभागृहात सकाळी ११.३० वाजता सहभागी होतील, असा विश्वास जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी बैठकीत व्यक्त केला.

या सोहळ्यास जिल्ह्यातील खेळाडू, क्रीडा यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन डॉ. इटनकर यांनी केले आहे. या विशेष समारंभासाठी आयोजन समितीसह विविध समित्यांचे गठण करण्यात आल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी पल्लवी धात्रक यांनी दिले.

जिल्हाधिकारी डॉ. इटनकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीस जिल्हा बुद्धीबळ संघटनेचे एस. एस. सोमण, महानगरपालिका, माध्यमिक शिक्षण विभाग व इतर विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# शेतकरी व नागरिकांनी महसूल सप्ताह यशस्वी करा : तहसीलदार डॉ. अमित घाटगे

## कुहीत १ ते ७ ऑगस्ट महसूल सप्ताह; सात दिवस विविध कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी, कुही, दि. ३१ :

महसूल विभागाकडून देण्यात येणाऱ्या सेवा, राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांबाबत नागरिकांना अधिकाधिक माहिती मिळावी. आणि त्यांना योग्य लाभ घेता यावा. तसेच शासनाच्या कामकाजाबद्दल नागरिकांचा विश्वास वृध्दींगत व्हावा, या उद्देशाने आयोजित केलेल्या महसूल सप्ताहात नागरिकांना सहभागी करुन घ्यावे. आणि नाविन्यपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन करुन १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट या कालावधीत राज्यात विशेष महसूल सप्ताहाचे आयोजन करण्याचे आवाहन मा. चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांनी केले आहे.

महसूल विभागाच्या सेवा, योजनांची माहिती व प्रत्यक्ष लाभ अधिकाधिक नागरिकांना मिळावा यासाठी, महसूल सप्ताहामध्ये अधिकाधिक नागरिकांना सहभागी करुन घ्यावे. सदर कार्यक्रमास जिल्ह्यातील सन्माननीय लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक, स्वयंसेवी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, विविध प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी, सर्व घटकातील मान्यवर व्यक्ती तसेच, अन्य विभागातील अधिकारी तसेच कर्मचारी यांना निमंत्रित करण्यात यावे. तसेच महसूल सप्ताहानिमित्त नाविन्यपूर्ण कार्यक्रमांचे



आयोजनासाठी प्राथमिकता दिलेली आहे

त्याअनुषंगाने कुही तालुक्यात १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट या कालावधीत महसूल सप्ताहात नागरिकांच्या सोयीसाठी विविध कार्यक्रमांचे/उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. १ ऑगस्ट रोजी "महसूल दिन साजरा करणे व महसूल सप्ताह शुभारंभाचा कार्यक्रम होणार आहे. तसेच "महसूल संवर्गातील कार्यरत / सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी संवाद उत्कृष्ट अधिकारी / कर्मचारी पुरस्कार वितरण व मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्र वितरण समारंभ आयोजित केल्या जाईल. २ ऑगस्ट रोजी "शासकीय जागेवर सन २०११ पूर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटुंबांपैकी अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र असलेल्या कुटूंबांना सदर अतिक्रमित जागांचे पट्टे वाटप करणेबाबत कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. ३ ऑगस्ट रोजी "पाणंद / शिवरस्त्यांची मोजणी करुन त्यांच्या दुतर्फा झाडे लावण्याचा कार्यक्रम आयोजित केल्या जाईल. ४ ऑगस्ट रोजी "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान" प्रत्येक मंडळनिहाय राबविण्यात येणार आहे. ५ ऑगस्ट रोजी "विशेष सहाय्य योजनेतील डीबीटी न झालेल्या लाभार्थ्यांना घरमेटी करुन डीबीटी करुन अनुदानाचे वाटप करण्यात येणार आहे. ६ ऑगस्ट रोजी "शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे निष्कासित करणे व त्या अतिक्रमणमुक्त करणे तसेच शर्तभंग झालेल्या जमिनींबाबत शासन धोरणानुसार (नियमानुकूल करणे/सरकारजमा करणे) निर्णय घेतल्या जाईल.

७ ऑगस्ट रोजी कृत्रिम वाळू धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कार्यशाळा आणि शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असून महसूल सप्ताहाचा सांगता समारंभ होईल. तरी महसूल सप्ताहात राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांचा लाभ तालुक्यातील शेतकरी व नागरिकांनी घेत महसूल सप्ताह यशस्वी करावा, असे आवाहन कुही तहसिलदार डॉ. अमित घाटगे यांनी केले आहे.

## गोदाम बांधकामासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३१ :

राष्ट्रीय खाद्य तेल अभियान सन 2025-26 अंतर्गत नागपूर जिल्ह्यास 250 मेट्रीक टन प्रती गोदाम क्षमतेचे एकूण 1 गोदाम बांधकामासाठी लक्षांक प्राप्त झाले आहे. गोदाम बांधकामासाठी लाभ घेण्यासाठी शेतकरी उत्पादक संघ, कंपनी पात्र असतील. प्रकल्प किंमतीच्या 50 टक्के किंवा 12.50 लाख रुपयांपैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय आहे. शेतकऱ्यांनी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांच्या प्राधिकृत अधिकारी अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मान्यता प्राप्त डिझाईन्स, स्पेकिफिकेशन खर्चाच्या अंदाजपत्रकासह तालुका कृषी अधिकारी कार्यालयास प्रस्ताव सादर करावा.

# कळमेश्वर खरेदी विक्री सोसायटीत लाखोंचा घोटाळा

■ महासागर प्रतिनिधी,
कळमेश्वर, दि. ३१ :

कळमेश्वर तालुका शेतकी खरेदी विक्री सोसायटी संदर्भात ३० जुलै रोजी संस्थेचे सभासद सदस्य व शेतकरी वर्गाच्या वतीने कळमेश्वर येथील निषादत्त सभागृहात झालेल्या पत्र परिषदेमध्ये १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५पर्यंतच्या खताच्या व औषधीच्या विक्रीमध्ये एकूण ४३ लाख ९५ हजार ३०४ रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाला असल्याचा आरोप पत्र परिषदेमध्ये करण्यात आला. कळमेश्वर तालुकास्थळी गेल्या ६५ वर्षांपासून शासकीय माफक दराने शेतकऱ्यांना खते व औषधे तसेच शेती उपयोगी. साहित्य मिळण्याचे एकमेव स्थान म्हणून नावलौकिक प्राप्त आहे.

या संस्थेचे अध्यक्ष म्हणून बाबाराव कोढे, उपाध्यक्ष आशिष गोविंदराव देशमुख व इतर संचालक मंडळ कार्यरत असून उपरोक्त संस्थेचे कळमेश्वर शहरासह तालुक्यात एकूण ९ युनिटे खरेदी विक्रीच्या सोसायटीच्या संचालक



मंडळाचे देखरेखी खाली सुरू आहे. यामध्ये कळमेश्वर येथे २ उपरवाही, उबाळी, कोहळी, धापेवाडा, मोहपा, तोंडाखैरी, लोहगड यामधील धापेवाडा युनिट मध्ये देविदास वडगुजी निकोसे कर्मचारी आहेत, तर संस्थेचे व्यवस्थापक म्हणून अरुण यादवराव कोल्हे हे काम पाहतात व्यवस्थापक अरुण कोल्हे यांनी धापेवाडा युनिटमध्ये १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ पर्यंत खते व औषधीच्या विक्रीमध्ये एकूण. ४३ लाख ९५ हजार ३०४ रुपयांचा आर्थिक घोटाळा झाला असल्याने धापेवाडा युनिट हे सावनेर पोलीस स्टेशन हद्दीत येत असल्याने दिनांक १२ एप्रिल २०२५ ला सावनेर पोलिसात तक्रार दाखल केली काल दि.३० जुलै रोजी झालेल्या पत्र परिषदेमध्ये उपस्थितानी आर्थिक घोटाळा विद्यमान संचालक मंडळाच्या संगनमताने झाला असून धापेवाडा युनिटमध्ये निव्वळ ४३ लाख ९५ हजार ३०४ रुपये पर्यंत मर्यादित नसून इतरही ८ युनिटमध्ये हा आर्थिक घोटाळा करोडो

**एसआयटी चौकशीची शेतकऱ्यांची मागणी**

रुपयाच्या घरात असल्याची दाट शक्यता वर्तवली आहे. हा घोटाळा इथेच न थांबता संस्थेमधील संचालक मंडळ यांचे प्रवास भत्ते व इतर खर्चात भरमसाठ वाढ करून व अन्य विविध कार्यक्रमाचा खर्च दाखवून संस्थेमधूनच केल्या जात असल्याचा गौप्यस्फोट ही त्यांनी केला याबाबतची तक्रार विभागीय सहनिबंधक नागपूर व जिल्हा उपनिबंधक नागपूर यांचे कडे करून सुद्धा आज पर्यंत कुठलीही ठोस कारवाई केली नसल्याचे सांगितले नागपूर जिल्ह्याचे काँग्रेसचे माजी मंत्री व माजी आमदार यांच्या अधिपत्याखाली हीं संस्था चालत असून राजकीय दबावापोटी अधिकारी वर्ग या घोटाळ्याकडे दुर्लक्ष करीत आहेत त्यामुळे या घोटाळ्याची उच्चस्तरीय तसेच एसआयटी मार्फत चौकशी करून संचालक मंडळ बरखास्त करावे प्रशासकाची नेमणूक करावी.

# गुणवंतांचा सत्कार आणि बुक बँकेचे लोकार्पण

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३१ :**

मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून, सिद्धीविनायक सेवा ट्रस्टच्या वतीने आमदार संदीप जोशी यांच्या पुढाकाराने आणि भारतीय जनता पार्टी प्रभाग 16 ड यांच्या सहकार्याने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व बुक बँक लोकार्पण सोहळा सायंटिफिक सभागृहात उत्साहात पार पडला.




या विशेष कार्यक्रमात दहावी, बारावी व अन्य शाखांमधील परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी 'बुक बँक' या उपक्रमाचेही लोकार्पण करण्यात आले, ज्याचा उद्देश गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत करणे हा आहे.

कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी नाथे पब्लिकेशनचे संजय नाथे, सराफ क्लासेसच्या संचालिका सुषमा सराफ, वानखेडे क्लासेसचे संचालक नरेंद्र वानखेडे, माजी नगरसेवक लखन येरावार, माजी नगरसेविका नीलिमा बावणे, 'आयकॅड'चे संचालक सारंग उपगन्लावार, भाजप धंतोली मंडळ अध्यक्ष विनोद शिंदे, उषा निशितकर आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमात करिअरच्या वाटा या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शनही करण्यात आले. नरेंद्र वानखेडे, संजय नाथे यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून विद्यार्थ्यांना यशस्वी भवितव्यासाठी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोज देशपांडे यांनी तर आभार प्रदर्शन नीरज दोंतुलवार यांनी केले. गजानन निशितकर, जयंत आदमने, अमोल वटक, प्रणव घुगरे, श्रीधर जलताडे सुहास बारई आनंद टोळ, राजीव रोडी, भरत गौरकर, संजय देशपांडे, श्री. व सौ. राधिका जलताडे वंदना शर्मा, कविता देशमुख, हेमा आदमने, संध्या अढाळ, पुष्पा शिन्दे, बेबीसिंग, अल्का इंदुरकर, रश्मी अवघडे, साधना शुक्ला, सरिता सनोडीया, कल्पना शुक्ला, नंदा चौधरी, मनोज फणसे, राजाभाऊ ठकनाईक, हेमंत कुलकर्णी, शरद राठी, आनंद माथनकर, राजु राऊत कीर्ति पुराणिक, निरंजन गाडगीळ, नितीन येते, श्रवण वर्मा, राहुल सुराणा, आशीष गुप्ता आदींनी सहकार्य केले.

विद्यार्थी, पालक आणि नागरिक यांची उत्स्फूर्त उपस्थिती हे कार्यक्रमाचे खास वैशिष्ट्य ठरले. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि बुक बँकसारख्या उपक्रमांमुळे सामाजिक जाणिवेतून शिक्षणाला चालना देणारा हा उपक्रम प्रशंसनीय ठरला.

# राज्यस्तरीय ग्रामरत्न सरपंच पुरस्काराने गजानन रामेकर व देवराव कडू यांचा गौरव



■ **महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. ३१ :**

दवलामेटी ग्रामपंचायतीचे सरपंच गजानन रामेकर आणि खडगाव ग्रामपंचायतीचे सरपंच देवराव कडू यांना राज्यस्तरीय "ग्रामरत्न सरपंच पुरस्कार" देऊन गौरविण्यात आले आहे. पंचायत राज विकास मंच आणि अखिल भारतीय सरपंच परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे, लोणावळा येथे पार पडलेल्या एका भव्य सत्कार समारंभात या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

सदर पुरस्कारासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून उत्कृष्ट कार्य करणाऱ्या सरपंचांची निवड करण्यात आली होती. त्या यादीत दवलामेटीचे सरपंच गजानन रामेकर आणि खडगावचे सरपंच देवराव कडू यांची निवड झाल्याने नागपूर तालुका परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

पुरस्कारप्राप्त सरपंचांना प्रशस्तीपत्र, शाल व श्रीफळ देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. त्यांच्या या यशाबद्दल उपसरपंच किशोर सरोदे, भोजराव मांडवगडे, पायल गणवीर, शैलेश कडू, अर्चना मांडवगडे, सरला कडू, किशोर मांडवगडे, स्मिता गणवीर, शितल उईके ,उपसरपंच अर्चना चौधरी ,सदस्य शितल वानखेडे, छाया खिल्लारे, शकुंतला अभ्यंकर, साधना शेंद्रे, रश्मी पाटील, सतीश खोब्रागडे, उज्वला गजभिये, प्रकाश मेश्राम, श्रीकांत रामटेके, अर्चना बनसोडे, शुभांगी पाखरे, प्रमोद गमे, प्रफुल्ल ढोले, गुणवंत घोडमारे, अजय जैस्वाल, दिलीप वर्मा, विनोद शर्मा, संतोषसिंग, धनराज दिघोरे, सुशील बावने, सुनील दुबे, विजय पिसोडे, महेश हिरनवार, राजेश चांदेकर, नितीन अडसड, संजय कपनीचोर, संगीता पोतदार, रेखा कोडापे, रमेश पांडे, स्नेहा बडवाईक, रमेश गोमासे, रोशन बडवाईक, भारत गजभिये, रोशन मेश्राम आदींनी अभिनंदन केले. ग्रामविकास आणि लोकसहभागातून गावांचा सर्वांगीण विकास साधणाऱ्या या सरपंचांचे कार्य प्रेरणादायी ठरत आहे.

# कळमेश्वरातील पीएमश्री न. प. माध्यमिक विद्यालयाचा अखिल भारतीय शिक्षण समागम

■ **महासागर प्रतिनिधी, कळमेश्वर, दि. ३१ :**

आज २९ जुलै रोजी केंद्र सरकारच्या वतीने राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित अखिल भारतीय शिक्षण समागम या महत्त्वपूर्ण कार्यक्रमात पीएमश्री नगर परिषद माध्यमिक विद्यालय, कळमेश्वर या शाळेने व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. देशातील उत्कृष्ट ६४४ पीएमश्री शाळेमधे कळमेश्वर येथील पीएमश्री नगर परिषद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कळमेश्वर ची निवड झाली.हा क्षण शाळेसाठी शहरासाठी, तालुक्यासाठी,अत्यंत गौरवास्पद आणि भावनिक होता.



केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेन्द्र प्रधान यांनी कार्यक्रमात मार्गदर्शन करताना राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या यशस्वी अंमलबजावणीबद्दल माहिती दिली. त्यांचे विचार विद्यार्थ्यांपर्यंत थेट पोहोचवण्याचा अद्वितीय अनुभव या कार्यक्रमामुळे मिळाला. कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण शाळेमध्ये स्मार्ट टीव्ही, प्रोजेक्टर आणि इंटरनेट सुविधेद्वारे दाखवण्यात आले. याप्रसंगी न.प.चे मुख्याधिकारी आकाश सुरडकर,गट शिक्षणाधिकारी कैलास लोखंडे, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष बिरजू रघुवंशी,वयोवृद्ध पालक धोटे,शाळेच्या प्राचार्य श्रीमती पौर्णिमा मेश्राम,विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांनी मोठ्या उत्साहाने कार्यक्रमात सहभाग घेतला. शाळेला हा दर्जा मिळून देण्यासाठी शाळेच्या प्राचार्य पौर्णिमा मेश्राम आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे अथक परिश्रम व त्यांचे कार्य इतर शाळेसाठी प्रेरक ठरणार आहे.

# तडीपार गुंडाला दंडाची शिक्षा

**नागपूर :** विना परवानगी शहरात दाखल होऊन शस्त्रासह हैदोस घालणाऱ्या गुंडाला मुख्य न्याय दंडाधिकारी वाय. के. रहांगडाले यांनी दोषी ठरवून न्यायालयाची कार्यवाही पूर्ण होतपर्यंत न्यायालयात हजर राहण्याचे आणि 10 हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. न्यू नंदनवन परिसरात राहणाऱ्या अजिंक्य अनिल चलेर्वार (30) याला गंभीर गुन्ह्यांची नोंद असल्याने तडीपार करण्यात आले होते. पोलिसांनी त्याला केडीके महाविद्यालयाजवळून शस्त्राच्या धाकावर हैदोस घालताना पकडले होते. पोलिस उपनिरीक्षक एस.यू.भास्कर यांनी प्रकरणाचा तपास करून न्यायालयात आरोप पत्र दाखल केले.

# राजपत्रित वैद्यकीय अधिकारी (गट अ) संघटनेची सभा

■ **महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. ३१ :**

राज्यातील राजपत्रित वैद्यकीय अधिकारी (गट अ) संघटनेची राज्य कार्यकारिणी सभा चिटणीस सेंटर नागपूर येथे पार पडली. सभेचे अध्यक्ष डॉ. राहुल कन्नमवार नागपूर, सरचिटणीस डॉ. संतोष हिंडोळे लातूर, कोषाध्यक्ष डॉ. राजेंद्र पवार नांदेड, मुख्य समन्वयक डॉ. निलेश टापरे बुलढाणा, डॉ. उमाकांत घरड पुणे, कार्यकारी अध्यक्ष डॉ. मनोज खोमणे पुणे, कार्याध्यक्ष डॉ. विजय आकोलकर यवतमाळ, डॉ. आर. एस. देवणीकर सहकार्याध्यक्ष व विविध जिल्ह्यातील



शंभराहून अधिक राज्य कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. सदर सभेत वैद्यकीय अधिकारी (गट अ) यांचे मूलभूत आणि महत्त्वपूर्ण प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. संघटनेचे विविध सेल अध्यक्ष व सचिवांपैकी अध्यक्ष पी.जी. सेल डॉ. नितीन मोरे व सचिव डॉ गणेश काळे, दुर्गम सेल अध्यक्ष डॉ. प्रशांत आखाडे, आयुष सेल अध्यक्ष डॉ. एम. डी. सरपाते, आस्थापना सेल अध्यक्ष डॉ. चैतन्य कागदे व प्रसिद्धी सेल अध्यक्ष डॉ. नरेंद्र डोमके व सचिव डॉक्टर संघर्ष राठोड यांनी शासन स्तरावर प्रलंबित प्रश्न निकाली काढण्याबाबत सादरीकरण केले.

महाराष्ट्र शासनासोबत योग्य समन्वय साधून वैद्यकीय अधिकारी यांचे कामाचे तास निश्चित करण्यात यावे तोवर बायोमेट्रिक अटेंडन्स रद्द बाद करण्यात यावी. वैद्यकीय अधिकारी (गट अ) यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर डी.ए.सी.पी. योजना लागू करण्यात यावी. प्रशासकीय बदली करिता पारदर्शक धोरण निश्चित करून समुपदेशनाने बदल्या करण्यात याव्यात.प्राथमिक आरोग्य केंद्राकरिता सुरक्षा रक्षक नियुक्त करण्यात यावेत या मागण्या पूर्ण करण्याबाबत एकमताने ठराव पारित करण्यात आले.

सदर सभेचे सूत्रसंचालन डॉ. संदीप गेडाम (चंद्रपूर )यांनी केले सभेच्या आयोजनाकरिता डॉ. प्रमोद रेवाळे (नागपूर), डॉ. मधुकर कुंभरे , डॉ. शंकर कैकाडे (भंडारा), डॉ. नरेंद्र डोमके (नागपूर), डॉ. प्रवीण पडवे जिल्हाध्यक्ष नागपूर, डॉ. प्रवीण उमरगीकर जिल्हासचिव नागपूर व डॉ. संदीप धरमठोक कोषाध्यक्ष नागपूर यांनी मेहनत घेतली .

# वडगाव येथे वृक्षारोपण

■ **महासागर प्रतिनिधी, बेला, दि. ३१ :**

जवळच्या वडगाव येथे आदिनाथ गुरुमाऊली सेवाश्रमाचे प्रचारक ह.भ.प. लीलाधर शिंदिकर महाराज यांनी स्थानिक शालेय मुलांना सोबत घेऊन अंदाजे 100 झाडांचे वृक्षारोपण केले. यंदा त्यांनी साग,चांफा,करंजी, व चिंचाचे रोप घरी तयार करून वृक्षारोपण केले. याशिवाय त्यांनी बेला येथील ईश्वर घुमडे यांना 15 झाडे, वडगाव येथील वामन शेंडे यांना 10 सागाची झाडे तर लोकेश उरकुडे यांना 10



सागाची झाडे वृक्षारोपणासाठी दिले. शिंदिकर दरवर्षीच पावसाळ्यात वृक्ष लागवड व संवर्धन करतात व शालेय मुला-मुलींमध्ये वृक्ष संवर्धनाबद्दल जनजागृती करतात. वृक्षारोपणासाठी कृष्णा शेंडे, श्री पटले, अंशू धोटे व सुजित लडी यांनी अथक परिश्रम घेतले.

# समाधान शिबिर व प्रधानमंत्री आवास योजना शहरी कॅम्पचे आयोजन

■ **महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. ३१ :**

वाना डोंगरी नगरपरिषद कडून 29 जुलै 2025 ला समाधान शिबिरचे आयोजन करण्यात आले होते. वाना डोंगरी नगरपरिषद चे मुख्याधिकारी राहुल परिवार यांनी लोकांच्या समस्या जाणून त्यांचा समस्याचे निवारण केले. शहरा मधल्या लोकांना सगळ्या सुविधा व योजना अत्यंत सहजपणे मिळाव्या या करिता मुख्याधिकारी राहुल परिवार यांचे प्रयत्न सुरू आहे.



सोबतच प्रधानमंत्री आवास योजना शहरी 2.0 चे सुद्धा कॅम्प आयोजित केले होते. प्रभाग क्रमांक 1ते10 मधल्ये नागरिकांचा प्रतिसाद मिळून त्यांना घरकुल योजनेची माहिती देण्यात आली व अर्ज भरण्यात आले.

वानाडोंगरी शहरातील लोकांना आपल्या हक्काचे पक्के मकान करिता घरकुल योजना च्या साह्याने त्यांना मदत मिळावी म्हणून प्रत्येक प्रभाग मध्ये शिबिरचे आयोजन करण्यात आले आणि नगरपरिषदचे अधिकारी व कर्मचारी लोकांची शिबिर मध्ये लोकांना पूर्णपणे मदत करत असून त्यांचे दस्तावेज घेऊन अर्ज भरून घेण्यात आले.

# नागपंचमीदिनी सर्पमित्रांनी दिले सापांना जीवनदान

■ **महासागर प्रतिनिधी, रामटेक, दि. ३१ :**

दि. २९/७/२०२५ पेंच व्याघ्र प्रकल्प नागपूर अंतर्गत वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय नागलवाडी (वन्यजीव) व आकाशझेप फाऊंडेशन रामटेक द्वारा संचालित आम्ही भारतीय अभियान यांचे संयुक्त विद्यमाने वनपरिक्षेत्राधिकारी प्रवीण लेले यांचे मार्गदर्शनाखाली नाग संवर्धन दिनानिमित्त दि.२९ जुलैला मकरधोकडा बीट परिसरात नाग आणि घोणस (विषारी), कवड्या आणि अजगर (बिनविषारी) या जातीच्या सहा सापांना त्यांच्या मूळ अधिवासात सुरक्षितरित्या सोडण्यात आले.



आकाशझेपचे सर्पमित्र व निसर्गमित्र अजय राऊत, प्रेम राऊत, रोशन भागडकर, सुमित भागडकर, आकाश राऊत, मनीष ढोरे, सारंग साहारे यांचे द्वारा हे सर्व साप २८ जुलैला सायंकाळी व २९ जुलैला सकाळी कोंडासावळी, भिवसेन, नेऊरवाडा व आवळेघाट या गावातून शेतकऱ्यांच्या घरून व फार्म हाऊस वरून रेस्क्यू करण्यात आलेले होते.

सदर घटनेची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी प्रवीण लेले यांना देऊन त्यांचे मार्गदर्शनाखाली आकाशझेप फाउंडेशनचे सचिव व आम्ही भारतीय अभियानाचे मुख्य संयोजक साक्षोधन कडबे, अंबाझरी येथील क्षेत्र सहाय्यक राजू नागपुरे, मकरधोकळा वनरक्षक बळवंत राऊत, शिलादेवी वनरक्षक कमलेश राऊत यांचे प्रमुख उपस्थितीत जंगलात सोडून सापांना वाचवण्याचा कृतिशील संदेश देण्यात आला.

यावेळी कडबे यांनी बोलताना, साप हा निसर्गाच्या अन्नसाखळीतील अत्यंत महत्त्वाचा घटक असून तो शेतकऱ्याचा देखील मित्र असल्याने तो दिसताच त्याला मारून न टाकता आमच्या सर्पमित्रांना बोलावून सापांना वाचवण्यास नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन केले." यावेळी अरविंद ढोरे, सुमित दुपारे, रोहित सोनटक्के, सतीश राऊत हे प्रामुख्याने उपस्थित होते.

# गोंडराजे बख्त बुलंदशहा यांची बसपाने साजरी केली जयंती

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३१ :**

विविध खेड्यामध्ये विभागलेल्या गावांना एकत्र करून 1702 ला नागपूर नगरीची स्थापना करून त्याला राजधानीचा दर्जा देणारे गोंडराजे बख्त बुलंदशहा उईके यांची आज बसपाने जयंती साजरी केली. कही हम भूल ना जाये या अभियानांतर्गत घेण्यात आलेला जयंती उत्सव नागपूरच्या विधान भवन चौकात असलेल्या गोंड राजांच्या भव्य पुतळ्याला अभिवादन करून केला. बसपा चे वरिष्ठ नेते कृष्णाजी बेले, उत्तम शेवडे, योगीराज लांजेवार, एड वीरेश वरखडे, शंभू कोहचाडे गोंड, चंद्रशेखर कांबळे यांनी माल्यार्पण केले.

गोंडराजे बख्त बुलंदशहा यांनी 1668 ते 1706 या कालावधीत सतत 38 वर्ष राज्य केले. नागपुरात त्यांनी स्वतःसाठी महाल व भव्य किल्ला बांधला, त्या संपूर्ण परिसराला महाल किंवा किल्ला वार्ड असे म्हटले जाते. शेजारी जुम्मा तलावाची निर्मिती केली व शहराच्या विविध भागात अनेक तलाव बांधलेत. त्यांची ऐतिहासिक समाधी आझमशाह लेआउट सक्करधरा पोलीस स्टेशन शेजारी आहे. त्यांचे वंशज आजही महाल येथील त्यांच्या वाड्यात राहतात. त्या ऐतिहासिक समाधीकडे व वास्तूकडे मात्र शासनाचे दुर्लक्ष आहे.

# शालेय वाहतूक धोरणातील विसंगतीमुळे स्कूल व्हॅन चालकांना मनस्ताप




## पत्रपरिषदेत आक्रोश

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ३१ :**

शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या ४२ आसनी खासगी स्कूल बसला प्रतिविद्यार्थी ४ हजार २०० रुपये रस्ते कर आकारला जातो. मग ७ आसनी स्कूल व्हॅनला प्रतिविद्यार्थी ७ हजार - रुपये कर का, असा सवाल स्कूल व्हॅन चालकांच्या विविध संघटनांकडून उपस्थित करण्यात आला. ही विसंगती दूर न केल्यास २३ ऑगस्टला आंदोलनाची घोषणा - करू, असा इशारा स्कूल व्हॅन चालकांच्या संघटनेकडून दिला गेला.

वाहतूक आघाडी वेलफेअर असोसिएशन आणि स्कूल व्हॅन चालक संघटना, नागपूर शहरतर्फे प्रेस क्लबमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेत असोसिएशनचे सचिव उदय आंबूलकर म्हणाले,शासनाच्या २०११ च्या शालेय वाहतूक धोरणातील विसंगतींमुळे स्कूल व्हॅन चालकांवर आर्थिक आणि मानसिक ताण निर्माण झाला आहे. शैक्षणिक संस्थांच्या मालकीच्या वाहनांसाठी वयोमर्यादा २० वर्षे असून खासगी स्कूल व्हॅनसाठी ती १५ वर्षे आहे. ही तफावत अन्यायकारक आहे. सर्वांसाठीच ही वयोमर्यादा २० वर्षे हवी. मोठ्या स्कूल बस एका फेरीत ३० ते ३५ विद्यार्थी वाहतूक करू शकतात, तर ७ आसनी व्हॅन ८-१० कि.मी.च्या परिसरात मर्यादित फेऱ्या करतात. त्यामुळे दोघांवर एकसमान नियम लावणे चुकीचे आहे.

रस्ते कराबाबतही मोठ्या बसला प्रति सीट ४ हजार २०० रुपये आकारले जाते तर सात आसनी खासगी स्कूल व्हॅनला प्रतिविद्यार्थी ७ हजार रुपये आकारून गरिबांची लूट केली जाते. शासनाने कररचना सुलभ करून एकसूत्रीय पद्धत लागू करायला हवी. सध्याच्या नियमावलीत केवळ खाजगी चालकांनाच दोषी ठरवले जाते, परंतु विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी उत्तरदायी असलेल्या पालक, शिक्षक, स्थानिक प्रशासकीय समिती यांची जबाबदारी मात्र विचारात घेतली जात नाही. प्रत्येक वर्षी फिटनेससाठी पासिंग दरम्यान नवनवे नियम लादले जातात. एकाच विभागातील अधिकाऱ्यांकडून भिन्न भिन्न मागण्या केल्या जातात, जेणेकरून चालकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो. तातडीने न्याय न मिळाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा यावेळी दिला गेला. पत्रपरिषदेला श्यामसुंदर सोनटक्के, विलीन पात्रीकर, अफसर खान, प्रकाश देवतळे आणि इतरही पदाधिकारी उपस्थित होते.

# शहर ग्रामीण भागात वाढला डासांचा प्रादुर्भाव

## तालुक्यात अनेक ठिकाणी फवारणीचा अभाव; आजार वाढण्याची शक्यता

■ **महासागर प्रतिनिधी, मौदा, दि. ३१ :**

हवामान बदलामुळे मौदा तालुक्यात आजूबाजूच्या गावांत शहरात डासांचा प्रादुर्भाव वाढत आहे. अशा परिस्थितीत डासांमुळे होणाऱ्या आजारांमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. असे असूनही, अनेक गावांमध्ये धूरफवारणी सुरू न केल्याने नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. पावसाळ्यात स्वच्छता, योग्य व्यवस्था नसल्याने ग्रामीण भागात सर्वत्र घाण पसरते. अनेक ठिकाणी लहान-मोठ्या खड्ड्यांमध्ये पाणी साचले आहे. पाण्याचा निचरा करण्यासाठी बनविलेल्या नाल्यांमध्ये आणि आजूबाजूला घाण पसरली आहे. त्यामुळे दिवसरात्र डासांची संख्या वाढत आहे. गावातील रस्त्यांवर डासांचा प्रादुर्भाव वेगाने वाढत



आहे. डासांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे लोकांचे जीवन कठीण होत आहे. डासांमुळे संसर्गजन्य आजार पसरण्याची शक्यता वाढत आहे.

ग्रामीण शहरी भागातील लोकांनी अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले असून परिसरात धूर फवारणी करण्याची मागणी केली. सायंकाळ होताच डासांमुळे नागरिकांच्या मनाची शांती हिरावून घेतली जाते. जेवणापूर्वी या डासांपासून बचाव करण्यासाठी अनेक प्रकारच्या व्यवस्था स्वतः कराव्या लागतात. जे श्रीमंत आहेत, ते रसायनांचा वापर करतात, तर सर्वसामान्य मच्छरदाणी लाऊन किंवा अगरबत्ती जाळून त्यापासून मुक्ती मिळविण्याचा प्रयत्न करतात.

घरांमध्ये डासांपासून बचाव करण्यासाठी लावलेल्या कॉइल्स पेटविल्यानंतर डास काही काळ पळून जातात. परंतु नंतर पुन्हा हल्ला करतात. जे लोक मच्छरदाणीत झोपत नाहीत, त्यांना डासांमुळे रात्रभर जागे राहावे लागते. मच्छरदाणी बसविल्यानंतरही काही चुकीमुळे डास जाळीत शिरतात. रात्रीच नव्हे तर दिवसाही डासांच्या प्रादुभार्वामुळे लोक त्रस्त आहेत. गत अनेक वर्षापासून डासांसाठी औषध फवारणी केली जात नाही. तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतच्या उदासीनतेमुळे पाणी साचणाऱ्या ठिकाणी फवारणीचे काम केले जात नाही.

तसेच स्वच्छता मोहीमही राबविली जात नाही. त्यामुळे त्रस्त ग्रामस्थांनी तत्काळ धूर फवारणी करण्याची मागणी केली आहे. मौदा शहरात अनेक खाली प्लॉट आहेत लेआऊट आहे त्यामध्ये खूप कचरा वाढलेला व पाणी साचलेलं आहे पण मौदा नगरपंचायत ने अजून पर्यंत फवारणी केली नाही याचा आगोदर दरवर्षी फवारणी झाली पण प्रशासक असल्यामुळे त्यांचे सुद्धा लक्ष नाही असे मत मौदा येथील स्थानिक नागरिकांनी व्यक्त केले

# शहरातील रस्त्यांना हेल्दी स्ट्रीट्सचे रूप देण्याचा निर्धार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३१ :

नागपूर शहरातील रस्ते पादचारी, वाहन चालकांसाठी सुरक्षित, सर्वसमावेशक आणि सुलभ व्हावेत याकरिता शहरातील रस्त्यांना 'हेल्दी स्ट्रीट्स' रूप देण्याचा निर्धार नागपूर महानगरपालिका आणि आयटीडीपी यांच्या संयुक्त विद्यमाने 'हेल्दी स्ट्रीट्स' या उपक्रमाअंतर्गत बुधवारी (ता.३०) वनामती सभागृह येथे आयोजित विशेष कार्यशाळेत उपस्थितांनी केला.

कार्यशाळेला नागपूरचे पोलीस आयुक्त डॉ. रविंद्रकुमार सिंघल, मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आयुक्त संजय मीना, मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, पोलीस उपायुक्त (वाहतूक) लोहित मतानी आणि नागपूर महामेट्रोचे महेश मोरोने उपस्थित होते.

उपस्थितांना मार्गदर्शन करताना मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी सांगितले की, नागपूर शहरातील रस्त्यावर चालताना पादचाऱ्यांना सुरक्षित वाटले पाहिजे. रस्ते हे पादचाऱ्यांसाठी सुयोग्य, सुरक्षित आणि अतिक्रमणमुक्त असायला हवे. असे सांगत डॉ. चौधरी पुढे म्हणाले की, रस्त्यांवर दिशादर्शक फलक, सुटसुटीत फूटपाथ व सायकल ट्रॅक असायला हवेत. रस्त्यांचे नियोजन करताना नागरिकांच्या सोयीचा आणि आरोग्याचा विचार व्हायला हवा. वर्धा रोडवरील वॉकेबल स्ट्रीटवर नागरिक सायंकाळी चालताना किंवा सायकल चालवताना आनंद घेतात आणि त्यामुळे त्यांचे आरोग्य ही चांगले राहते.



मनपा व आयटीडीपीची विशेष कार्यशाळा

डॉ. चौधरी यांनी अतिक्रमण करणाऱ्यांविरोधात कारवाई करण्याची आणि गरज पडल्यास पोलिसांकडून दंडात्मक कारवाई करण्याची सूचनाही दिली. पुढील काही महिन्यांत शहरात १५ ते २० किलोमीटर अंतराचे पादचाऱ्यांसाठी अनुकूल मार्ग तयार करण्यात येणार आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

नागरिकांमध्ये जनजागृती करण्याबाबत त्यांनी भर दिला. तसेच कंत्राटदार आणि त्यांच्या कामगारांसाठी जनजागृती व प्रशिक्षण कार्यशाळा घेण्याचे निर्देश ही त्यांनी दिले.

पोलीस आयुक्त डॉ. रविंद्रकुमार सिंघल यांनी सांगितले की, नागपूर शहरात दरवर्षी सरासरी ३४८ नागरिकांचा रस्ता अपघातांमध्ये मृत्यू होतो. मात्र, यंदा योग्य पोलिसिंगमुळे आतापर्यंत ७० मृत्यू टळले आहेत. रस्ते सुरक्षित आणि सर्वसमावेशक करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. त्यांनी रामगिरी मार्गाला 'हेल्दी स्ट्रीट्स' म्हणून विकसित करण्याच्या सूचना दिल्या. नागरिकांमध्ये शिस्त आणि जनजागृती निर्माण करणे हे देखील महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

नागपूर महानगर विकास प्रदेश प्राधिकरणाचे आयुक्त संजय मीना यांनी शालेय विद्यार्थ्यांना वाहतुकीचे धडे देण्याची गरज व्यक्त केली. सध्या शहरात वाहने अत्यंत वेगाने चालवली जातात, त्यामुळे शिक्षणपद्धतीत बदल करून वाहतुकीबाबत जनजागृती निर्माण करणे गरजेचे आहे. अभियंते आणि कंत्राटदारांनाही प्रशिक्षित करणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी यावेळी नमूद केले.

मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांनी रस्त्यांचे शास्त्रीय पद्धतीने नियोजन करण्यावर भर दिला. आयटीडीपी इंडिया तर्फे प्रकल्प व्यवस्थापक प्रांजल कुलकर्णी, सिद्धार्थ गोडबोले, स्मृती सवाने, यांच्यासह तज्ञ प्रसन्न देसाई, प्रताप भोसले, विकास ठाकर आणि यांनी हेल्दी स्ट्रीट्स संकल्पनेची माहिती दिली. तसेच रस्ते कसे असावेत याविषयी सादरीकरण केले.

कार्यक्रमात मनपाचे मुख्य अभियंता मनोज तलेवार, अधीक्षक अभियंता लीना उपाध्ये, कार्यकारी अभियंता श्रीमती अल्पना पाटणे, अश्विनी येलचटवार, सर्व झोनचे कार्यकारी अभियंता, नागपूर सुधार प्रन्यासचे प्रशांत भांडारकर, स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या डॉ. प्रणिता उमरेडकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# वाघाच्या पिंजऱ्यात तरुणाची उडी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३१ :

प्राणीसंग्रहालय किंवा एखाद्या राष्ट्रीय उद्यानातील प्राणी बघण्यासाठी लोकांची मोठी गर्दी असते. या ठिकाणांवर अनेकदा लोक दगड मारतात किंवा ओरडतात. लोकांच्या या वागण्यामुळे प्राण्यांना नक्कीच त्रास होतो. अशात काही दुर्घटना घडली तर सगळ्यांना धक्का बसतो. अशीच एक घटना उपराजधानीतील ब्रिटिशकालीन प्राणीसंग्रहालयात गुरुवारी सकाळी घडली. कृषी महाविद्यालयाच्या अखत्यारीत असलेल्या महाराजबाग प्राणीसंग्रहालयात एक माणूस शिरला आणि मग प्राणीसंग्रहालय प्रशासनात धावाधाव सुरू झाली.

दीडशेवर्षाहून अधिक जुने ब्रिटिशकालीन महाराजबाग प्राणिसंग्रहालय नागपूर शहराच्या मध्यवर्ती भागात आहे. या प्राणिसंग्रहालयाची धुरा डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ यांच्या अंतर्गत नागपुरातील कृषी महाविद्यालयाच्या अखत्यारीत आहे. दररोज शेकडो पर्यटक याठिकाणी येत असतात. दरम्यानच्या काळात मॉर्निंग वॉक साठी महाराजबागेत नागरिक यायचे आणि परिसरात असलेल्या प्राणिसंग्रहालयातील प्राण्यांना खाद्यवस्तू द्यायचे. त्यामुळे हे प्रकरण न्यायालयात गेले आणि मॉर्निंग वॉक साठी येणाऱ्या नागरिकांना याठिकाणी बंदी घालण्यात आली.



गुरुवारी सकाळी सहा वाजताच्या सुमारास एक व्यक्ती प्राणिसंग्रहालय परिसरात शिरला. चौकीदाराच्या लक्षात येताच त्याला बाहेर काढले. दरम्यान, साडेसात वाजताच्या सुमारास प्राणिसंग्रहालयातील प्राण्यांच्या पिंजऱ्यातील सफाई कर्मचारी वाघाच्या पिंजऱ्याची सफाई करण्यास गेले असता त्यांना हा व्यक्ती वाघाच्या पिंजऱ्यात आढळला. कर्मचाऱ्यांनी तातडीने प्राणिसंग्रहालय प्रशासन, वनविभाग तसेच सीताबर्डी पोलीस ठाण्यात सूचना दिली.

# डॉ. उदय बोधनकर यांना केनिया येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत स्क्रोल ऑफ ऑनर सन्मान

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३१ :

कॉमनवेल्थ असोसिएशन ऑफ हेल्थ अँड डिसेबिलिटीचे कार्यकारी संचालक डॉ. उदय बोधनकर यांना ग्लोबल असोसिएशन ऑफ फिजिशियनस ऑफ इंडियन ओरिजिन GAPIO (USA), ब्रिटिश असोसिएशन ऑफ फिजिशियनस ऑफ इंडियन ओरिजिन BAPIO (UK), आणि कॉमनवेल्थ असोसिएशन ऑफ हेल्थ अँड डिसेबिलिटी, युनायटेड किंगडम COMHAD UK यांच्या संयुक्त विद्यमाने केनिया देशातील नैरोबी येथे आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत स्क्रोल ऑफ ऑनर या प्रतिष्ठित सन्मानाने गौरविण्यात आले.



हा सन्मान विशेष गरजा असलेल्या व आजारी बालकांच्या सेवेसाठी त्यांच्या निस्वार्थ, समर्पित योगदानाबद्दल प्रदान करण्यात आला. डॉ. बोधनकर यांचे सहृदय आरोग्यसेवा कार्य आणि सर्वसमावेशक विकासाचा दृष्टिकोन जगभरातील दुर्बल मुलांच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडवणारा ठरला आहे. कॉमनवेल्थ असोसिएशन हेल्थ अँड डिसेबिलिटी युनायटेड किंगडम चे कार्यकारी संचालक आणि IAP चे माजी राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून, डॉ. बोधनकर यांनी बाल आरोग्य आणि दिव्यांग सेवा क्षेत्रात जागतिक पातळीवर महत्त्वपूर्ण सहकार्य निर्माण केले आहे. या आंतरराष्ट्रीय सन्मानानंतर, अनेक मान्यवर व्यक्तींनी डॉ. बोधनकर यांचे अभिनंदन केले. त्यामध्येः डॉ. वसंत खलातकर, राष्ट्रीय अध्यक्ष, IAP; डॉ. वेदप्रकाश मिश्रा, प्रो चान्सलर; प्रा. मृदुला फडके, सल्लागार, UNICEF; डॉ. सुनील खपर्डे, सल्लागार, भारत सरकार; डॉ. यशवंत पाटील, अध्यक्ष, कम्युनिटी पीडियाट्रिक्स, भारतीय बालरोग संघटना मुख्यालय; डॉ. नीलम मोहन, राष्ट्रीय अध्यक्ष-निर्वाचित, भारतीय बालरोग संघटना मुख्यालय, डॉ. सुधीर मंगरुलकर, अध्यक्ष, रोटरी क्लब ऑफ नागपूर होरायझन; नैचुरोपैथी व योग थेरेपिस्ट डॉ. प्रवीण डबली, नियोग थेरेपिस्ट डॉ. विजय गुप्ते तसेच असोसिएशन ऑफ पेडियाट्रिक्स (AOP,) इंडियन मेडिकल असोसिएशन नागपूर ऑपब्स्टेट्रिक्स अँण्ड गायनॅकॉलॉजीकल सोसायटी, नॅशनल असोशियन फॉर रिप्रोडक्टिव अँड चाईल्ड हेल्थ ऑफ इंडिया (नारची)चे स्थानिक अध्यक्ष व सचिव आणि अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय गैर-सरकारी संघटना प्रतिनिधींनी शुभेच्छा दिल्या. हा सन्मान डॉ. बोधनकर यांच्या सेवाभावी कार्याची, नेतृत्वगुणांची आणि जागतिक स्तरावर केलेल्या उत्कृष्ट योगदानाची जाणीव करून देणारा आहे.

# असामाजिकतत्वांनी घातला हैदोस दुकान आणि वाहनांची तोडफोड

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३१ :

इमामवाड्याच्या सीरसपेठ परिसरात असामाजिकतत्वांनी शस्त्रांसह प्रचंड हैदोस घातला. एका दुकानाची तोडफोड केल्यानंतर वाहनांचेही नुकसान केले. या घटनेने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या प्रकरणी पोलिसांनी श्रावण लखनलाल नायक (51) रा. सिरसपेठच्या तक्रारीवरून परिसरातच राहणाऱ्या पियूष शैलेष बेले आणि त्याच्या 4 साथीदारांवर विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे.

श्रावण यांचा सिसरपेठ परिसरातच स्मोक डोझ नावाने पानठेला आहे. फेब्रुवारी महिन्यात पियूष आणि त्याच्या साथीदारांनी श्रावण यांचा पानठेला जाळला. त्यांच्याविरुद्ध श्रावण यांनी इमामवाडा ठाण्यात तक्रार केली होती. पोलिसांनी पियूषविरुद्ध गुन्हाही नोंदवला होता. तेव्हापासून पियूष सतत श्रावण यांना त्रास देत होता. मंगळवारी रात्री 11 वाजताच्या सुमारास पियूष आणि त्याचे साथीदार हातात तलवार आणि चाकू घेऊन परिसरात आले. त्यावेळी श्रावण घरी आराम करीत होते. बाहेरचा गोंधळ ऐकून श्रावण बाहेर आले असता पियूष शिविगाळ करीत धमकावू लागला. आरोपींनी श्रावण यांचा पानठेला उलटवला. त्यांनी विरोध केला असता आरोपी केशवद्वारकडे पळाले. तेथे आरोपींनी तलवार आणि सत्तूरने देवेंद्र बेलेकर नावाच्या व्यक्तीच्या ऑटोरिक्शाची तोडफोड केली. त्यानंतर मयूर लिल्हारे यांना भेटण्यासाठी आलेल्या विक्की बंडातेच्या कारच्या काचा फोडल्या. परिसरातील इतर वाहनांचीही आरोपींनी तोडफोड केली आणि फरार झाले. या घटनेने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

# सुरक्षा रक्षकावर बिबट्याचा हल्ला



■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक, दि. ३१ :

रामटेक वनपरीक्षेत्र हद्दीत येत असलेल्या सत्रापूर शिवारात अस्मिता ऑरगॅनिक फार्मवर कार्यरत असलेल्या सुरक्षा रक्षकावर भरदिवसा बिबट्याने हल्ला केल्याची घटना दि. २८ जुलै रोजी दुपारी २ वाजताच्या सुमारास घडली.

गट ग्रामपंचायत बोरडा अंतर्गत येणाऱ्या सत्रापूर गावाजवळील शिवारात असणाऱ्या अस्मिता ऑरगॅनिक फार्मवर रामचंद्र प्रेमदास शेंदरे, वय ३६ वर्षे, रा. सराखा (बोरडा) हे सुरक्षारक्षक म्हणून कार्यरत आहेत. दुपारी २ वाजताच्या सुमारास फार्म जवळील परिसरातील पाण्याच्या पाईप मध्ये बिबट्या दडून बसला होता. कर्तव्यावर असलेल्या सुरक्षा रक्षकावर बिबट्याने भीषण हल्ला केला यात त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. यावेळी उपस्थित कामगारांनी आरडाओरड केल्यानंतर बिबट्या तेथून पसार झाला. तात्काळ जखमीला रामटेक उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता गंभीर दुखापत असल्याने पुढील उपचारासाठी नागपूर मेडिकल येथे पाठविण्यात आले आहे. घटनेची माहिती रामटेकचे वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल शिंदे यांना देण्यात आली असून त्यांनी तात्काळ मनसरचे क्षेत्र सहाय्यक मुनेश्वर गोंडीमेश्राम यांना घटनास्थळी पाठवून पंचनामा तयार करण्यास सांगितले. वनविभागाकडून नुकसान भरपाई देण्याची मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

# मनपाच्या ५० गुणवंत सफाई कामगारांचा सत्कार

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ३१ :

शहराला स्वच्छ, सुंदर आणि नागरिकांचे आरोग्य चांगले राखण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या ५० गुणवंत सफाई कर्मचाऱ्यांचा नागपूर महानगरपालिकेच्यावतीने शहीद सफाई सैनिक दिनानिमित्त गुरुवारी (ता.३१) सत्कार करण्यात आला. गुणवंत सफाई कामगारांचा शाल, श्रीफळ, तुळशी रोपटे आणि प्रत्येकी 5 हजारांचा धनादेश देऊन मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत व घनकचरा विभागाचे उपायुक्त राजेश भगत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



मनपा मुख्यालयातील अतिरिक्त आयुक्त सभा कक्षात आयोजित समारंभात मनपाचे जनसंपर्क अधिकारीमनीष सोनी, मुख्यालय झोनल अधिकारी लोकेश बासनवार, सर्व झोनल अधिकारी, स्वच्छता निरीक्षक प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी वाल्मिकी आणि महर्षी सुदर्शन महाराज यांच्या फोटोला माल्यार्पण करण्यात आले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांनी ३१ जुलै शहीद सफाई सैनिक दिनाचे महत्त्व विषद केले. सफाई कामगारांच्या तत्परतेमुळे शहर स्वच्छ आणि सुंदर आहे. शहराची सफाई करणे हे मेहनतीचे काम आहे. असे. अशा सफाई कामगार दरदिवशी शहराला स्वच्छ ठेवत असतात यामुळे शहरातील नागरीकांचे आरोग्य चांगले राहण्यात मदत होते. चांगले कर्तव्य करणाऱ्या सफाई कामगारांचा सत्कार मनपातर्फे केला जात असून हा सत्कार इतर कामगारांनाही प्रेरणादायी ठरेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

उपायुक्त राजेश भगत म्हणाले की, शहराला सुंदर आणि स्वच्छ ठेवण्याकरिता सफाई कामगार कर्तव्यावर हजर असतात. शहराला स्वच्छ ठेवून नागरीकांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी जे सफाई कामगार चांगले काम करतात त्यांचा सत्कार मनपातर्फे करण्यात येत आहे. तसेच पुढेही अशा गुणवंत सफाई कामगारांचा सत्कार करण्यात येणार आहे. सफाई कामगारांच्या या सत्कारामुळे इतर कामगारांनाही प्रेरणा मिळेल.

यावेळी जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी यांनी प्रास्ताविकात ३१ जुलै १९५४ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात दिल्ली येथे सफाई कर्मचाऱ्यांच्या न्यायिक मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले होते.

या आंदोलकांवर झालेल्या गोळीबारात सफाई कर्मचारी भूपसिंग शहीद झाले. त्यांच्या स्मृतीमध्ये देशभर हा दिवस शहीद सफाई कर्मचारी दिवस म्हणून साजरा केला जातो. महानगरपालिकेमध्ये सफाई कामागराचे प्रमाण अधिक असल्याने मागील काही वर्षापासून ३१ जुलै रोजी गुणवंत स्थायी सफाई कामगारांचा सत्कार करण्यात येत असल्याचे सांगितले.

# स्त्रीबीज दान करण्यासाठी गेलेल्या महिलेचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ३१ :

शेजाऱ्यांच्या बोलण्यात येऊन अंडी दान करण्यासाठी आयव्हीएफ केंद्रात गेलेल्या महिलेची प्रक्रियेदरम्यान प्रकृती खालावली आणि उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. यामुळे संतप्त कुटुंबीयांनी डॉक्टरवर निष्काळजीपणाचा आरोप लावत मृतदेहासह सदर पोलिस ठाण्यात ठिय्या आंदोलन केले. डॉक्टरसह महिलेला आमिष दाखविणाऱ्या शेजारी दाम्पत्याविरुद्ध कठोर कारवाईची मागणी केली. यामुळे काही वेळासाठी ठाण्यात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. सदरचे ठाणेदार मनीष ठाकरे यांनी प्रकरणाचा निष्पक्ष तपास करून आरोपींवर योग्य कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यानंतर महिलेवर अंत्यसंस्कार करण्यात आले. निकीता विशाल डोंगरे (23) रा. कामठी असे मृत महिलेचे नाव आहे.

निकीताचा पती विशाल हातमजुरी करतो. डोंगरे दाम्पत्याला मिहीर नावाचा दोन वर्षांचा मुलगा आहे. निकीताच्या घराशेजारीच प्रियंका आणि बादल देशभ्रतार राहतात. दोघांचेही निकीताच्या घरी येणे-जाणे आहे.

बादल आणि प्रियंका यांनी निकीताला सुलभतेने 15 हजार कमावण्याचे आमिष दाखविले. सदरच्या इंदिरा आयव्हीएफ केंद्रात गभार्तील अंडी दान केल्यावर 15 हजार रुपये मिळण्याची माहिती दिली. अंडी काढण्याचा सर्व खर्चही संबंधितांकडूनच केला जात असल्याचे सांगितले. 16 जुलैपासून दोघेही विशालच्या गैरहजेरीत निकीताला इंदिरा आयव्हीएफ केंद्रात घेऊन जात होते. जवळपास 10 दिवसांपर्यंत ही प्रक्रीया चालली. 27 जुलै रोजी विशाल घरी झोपलेला होता. या दरम्यान घरी आलेल्या प्रियंका आणि बादलने निकीताला त्यांच्यासोबत येण्यास सांगितले. आयव्हीएफ केंद्रात गभार्तून अंडी काढण्याची प्रक्रिया सुरू असताना अचानक निकीताची प्रकृती खालावली. दुपारी प्रियंकाने विशाल याला फोन करून याबाबत माहिती दिली.

निकीताला रामदासपेठ परिसरातील रुग्णालयात भरती करण्यात आले. मंगळवारी सकाळी 9 वाजताच्या सुमारास डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. कुटुंबीय तक्रार घेऊन सीताबर्डी ठाण्यात पोहोचले असता कामठी ठाण्यात जाण्यास सांगण्यात आले. कामठी ठाण्यात गेले असता त्यांनी सदर ठाण्यात जाण्यास सांगितले. विशालने शहर काँग्रेस कमिटीच्या अल्पसंख्याक सेलचे अध्यक्ष वसीम खान यांच्याशी संपर्क केला. वसीम यांनी बुधवारी उत्तरीय तपासणीची प्रक्रिया पूर्ण करून घेतली आणि निकीताचा मृतदेह घेऊन कुटुंबीयांसह सदर ठाण्यात पोहोचले.

# उमरेडच्या निकिताची लंडनच्या वार्विक विद्यापीठात चमकदार कामगिरी

■ महासागर प्रतिनिधी, उमरेड, दि. ३१ :

उमरेडचा अभिमान ठरलेली निकिता गंगाधर तेलरंधे हिने युनायटेड किंगडममधील यूनिवर्सिटी ऑफ वार्कविक या जागतिक दर्जाच्या विद्यापीठातून प्रोग्राम मैनेजमेंट या शाखेत पदव्युत्तर पदवी डिस्टिंक्शन आणि मेरिटसह संपादन केली आहे.

निकीताच्या अभ्यासक्रमात अनेक विषयांमध्ये डिस्टिंक्शन मिळाली असून तिला विद्यापीठातर्फे वर्कविक अवार्डने विशेष सन्मान प्रदान करण्यात आला आहे. ती भारत सरकारकडून नामांकित शिष्यवृत्तीधारक असून, विद्यापीठाकडून आयोजित विशेष स्कॉलरशिप डिनर साठीही तिची निवड झाली होती.

या अभूतपूर्व यशानंतर निकिता आता पुढील दोन वर्ष युनायटेड किंगडममध्ये आंतरराष्ट्रीय प्रोजेक्ट्ससह विविध क्षेत्रांत इंटर्नशिप करणार आहे. या अनुभवातून जागतिक कामकाजाची पद्धत शिकून ती भारतात परतेल आणि भारत सरकारसोबत काम करेल, अशी प्रतिक्रिया तिने व्यक्त केली आहे. निकीताला लीड्स, मँचेस्टर, बर्मिंगहॅम, यॉर्क, ग्लासगो यांसारख्या दिग्गज विद्यापीठांकडून प्रवेशासाठी ऑफर मिळाल्या होत्या. उमरेडसारख्या ग्रामीण भागातून येऊन जगभरात स्वतःचा ठसा उमटवणाऱ्या निकीताने आपल्या बुद्धिमत्ता, चिकाटी आणि सेवाभावी वृत्तीमुळे केवळ संपूर्ण देशासाठी अभिमान निर्माण केला आहे. तिचा प्रवास नव्या पिढीला नक्कीच प्रेरणा देणारा ठरेल. निकीताचं हे यश ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असून, जागतिक मंचावर उमरेडसारख्या छोट्या शहरातील तरुणाई किती मोठी भरारी घेऊ शकते याचं हे उत्कृष्ट उदाहरण आहे.



"माझं ध्येय केवळ जागतिक शिक्षण घेणं नव्हतं, तर त्या ज्ञानाचा उपयोग आपल्या देशाच्या विकासासाठी करणं हेही तितकंच महत्त्वाचं आहे. मी लवकरच भारतात परतेन आणि भारत सरकारच्या योजनांमध्ये सहभागी होऊन देशासाठी काम करेन."

# कामातील उत्कृष्टता जपण्यासाठी स्वयंसेवी संस्था असरकारी असाव्या : डॉ. गिरीश गांधी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३१ :

केंद्र सरकारचे व राज्य सरकारचे अधिकारी केवळ योजना राबवितात ज्या अयशस्वी होतात पण स्वयंसेवी संस्थांकडून निर्माण होणारे मॉडेल्स हे यशस्वी होतात कारण त्यात त्या संस्थेची तपस्या, प्रामाणिकपणा, ध्येयवाद, वचनबद्धता अंतर्भूत असते. म्हणूनच कामातील उत्कृष्टता जपण्यासाठी स्वयंसेवी संस्था असरकारीच असायला हव्यात असे ठाम मत वनराईचे विश्वस्त डॉ. गिरीश गांधी यांनी मांडले.

औचित्य होते बाबुराव धनवटे सभागृहात वनराई फाऊंडेशन द्वारा आयोजित स्व. इब्राहिम पठाण स्मृती पर्यावरण पुरस्कार वितरण सोहळ्याचे. पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्यांना प्रेरणा म्हणून दिला जाणारा हा पुरस्कार सामाजिक, शैक्षणिक व वैज्ञानिक तसेच पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे निसर्ग विज्ञान मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय घुगे यांना एशियाटिक बिग कॅट सोसायटी व महाराष्ट्र राज्य वनरक्षक व पदोन्नत वनपाल संघटनेचे अध्यक्ष अजय पाटील यांच्या शुभहस्ते सपत्नीक प्रदान करण्यात आला. यावेळी मंचावर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ पत्रकार बाळ कुळकर्णी उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. गिरीश गांधी यांनी भूषविले.

यावेळी गिरीश गांधी पुढे म्हणाले की एक अण्णा हजारे सोडले तर पोपटराव पवारांपासून तर अनेक कार्यकर्त्यांच्या गावाचा आढावा घेतला असता एकही गाव आदर्श प्रत



आढळले नाही. याचे कारण लपले आहे त्यांना समाजाकडून मिळणारे अपुरे पाठबळ. सामाजिक,शैक्षणिक, पर्यावरण क्षेत्रात कार्य करणा?्या कार्यकर्त्यांना राजश्रय व लोकाश्रय मिळणे आवश्यक आहे. गुरुदेव सेवा मंडळाचे कार्य करणारे ज्ञानेश्वर, डॉक्टर विजय घुगे यांच्यासारख्यांनी आपला वसा सोडला नाही कारण त्यांना माहित आहे की कुठेतरी आपल्या कायाची दखल घेतली जात आहे. म्हणूनच अशा पुरस्कारांची गरज अधोरेखित होते. सत्काराला उत्तर देताना डॉक्टर विजय घुगे म्हणाले की कोणतेही कार्य करण्याची हिम्मत जर एकट्याने दाखवली तर त्याला आपोआपच सामाजिक पाठबळ मिळते. शालेय व विद्यार्थी जीवनाच्या अनुभवातून पर्यावरण शिक्षणाची गरज असल्याची जाणीव मला झाली. याच प्रेरणेतून निसर्ग विज्ञान मंडळ सुरू केले व पर्यावरण विषयक जनजागृती शाळा शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांमध्ये घडवून आणण्याचे कार्य केले. विज्ञानाचा विकास होत असताना पृथ्वीचा विनाश तर होत नाही ना आणि जर होत असेल तर या विनाशाची जनजागृती करण्याची गरज निर्माण झाली आहे. आणि ही जनजागृती गावागावात जाऊन करण्यासाठी उमरेड तालुक्यातील 40 गावांमध्ये निसर्ग विज्ञान शाळा,जंगला जंगलात शिबिरे सुरू केले. कोणतीही कार्य तडीस जावयाचे असेल तर सुसंगता, नियोजन व संकल्प याशिवाय कणखर ध्येय असणे आवश्यक आहे. पर्यावरणाचे रक्षण करायचे असेल तर जल, जंगल, जमीन व जनावरांचे रक्षण करणे गरजेचे आहे. आणि यासाठी अ पर्यावरणीय तत्वांचा ऱ्हास हा शासकीय अंमलबजावणीतून होणे आवश्यक आहे.